





पुण्य नगरी

# आरोग्यजागर

| उत्तम आरोग्य | उज्ज्वल भविष्य | पुणे, मंगळवार, ९ जून २०१५




# मुलांमधील मतिमंदत्व

## Mental Retardation

मतिमंदत्व म्हणजे शारीरिक, मानसिक, भावनिक आणि ज्ञानेंद्रियांचा विकास खुंटणे. असे अपंगत्व १८ वर्षांखालील मुलांमध्ये आढळून येते. अशा मुलांची बौद्धिक पातळी (IQ Level ) सर्वसामान्य मुलांच्या बौद्धिक पातळीपेक्षा कमी असते. ज्यामुळे त्यांना दैनंदिन जीवनातील कौशल्ये आत्मसात करता येत नाहीत. थोडक्यात बोलणे, दुसऱ्या व्यक्तींबरोबर संवाद साधणे, स्वतःच्या आरोग्याविषयीच्या गोष्टी न कळणे, स्वतःची काळजी घेता न येणे. अशा मुलांचा IQ score ७० ते ७५ पेक्षा कमी असतो, असे अपंगत्व लहानपणीच १८ वर्षांच्या आतील मुलांमध्ये सुरू होते आणि प्रौढत्वापर्यंत चालूच राहाते.

मतिमंदत्व हे मेंदूतील कार्यक्षमतेतील बिघाडावर अवलंबून आहे. जन्मतःच मतिमंदत्व असलेल्या मुलांमध्ये मान धरणे, बोलणे, चालणे हे महत्त्वाचे टप्पे त्यांच्या बरोबरीच्या मुलांपेक्षा विलंबित होतात, ही विकलांगता जन्मतःच किंवा मुले शाळेत जाताना दिसून येते. अशा विकलांग मुलांमध्ये समाजात म्हणजेच इतर मुलांबरोबर बोलणे, वैचारिक देवाणघेवाण करणे, जुळून घेणे जड जाते. शाळेत त्यांच्याबरोबरीच्या मुलांप्रमाणे लिहिणे, बोलणे, आत्मसात करणे हे अवघड जाते. काही मतिमंद मुलांमध्ये आक्रस्ताळेपणा, दुसऱ्याला व स्वतःला त्रास देण्याची वृत्ती असते. काही मुले अतिचंचल स्वभावाची असतात. ज्या मुलांमध्ये मेंदूतील रोगांमुळे (Encephalitis/ meningities) मतिमंदत्व येते त्यांच्यामुळे संज्ञात्मक (बोधात्मक)(congnitive) त्रुटी आढळतात.

अशा आजारांचे वर्गीकरण Diagnostic & statistical manual of Mental Disorder (DSM) नुसार ४ भागांमध्ये केले आहे.

Mild, Moderate, Severe & Profound

१. Mental Retardation(Mild)- या मुलांची बौद्धिक पातळी ५० ते ७५ च्या दरम्यान असते. अशा रुग्णांना मदत मिळाली तर ते सामान्य जीवन जगण्याची कौशल्ये आत्मसात करून स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात.

२. Moderate:- या मुलांची बौद्धिक पातळी ३५ ते ५५ च्या दरम्यान असते. थोड्याशा देखरेखीखाली ते संभाषण कौशल्य व शरीरसौष्ठव कौशल्य आत्मसात करू शकतात. अशा मुलांना समुदायात (community) ठेवून संभाषण कौशल्य शिकवावी लागतात.




होमिओपॅथी
चिकित्सा व उपचार
डॉ. अमरसिंह निकम


३.Sever:- यांची बौद्धिक पातळी २० ते ४० च्या दरम्यान असते. अशा मुलांना दैनंदिन कौशल्ये शिकवावी लागतात.

४.Profound:- बौद्धिक पातळी २० ते २५ पेक्षा कमी असते. त्यांना वैयक्तिक काळजी व देखरेखीची गरज असते.

**कारणे :-**

जनुकीय कारणे : आईवडिलांकडून मुलात उतरलेले जनुकीय अस्वाभाविक रचनात्मक बदल (Genes) हे बरेचसे मतिमंद रोगाचे कारण ठरू शकते. उदाः Down Syndrome, Pheny ketonuria, Neurofibromatosis वगैरे वगैरे.

**गरोदरपणातील तक्रारी :** जर अर्भकाची वाढ व्यवस्थित होत नसेल, आईने गरोदरपणात मद्यपानाचे सेवन केले किंवा रुबेला जिवाणूंचा संसर्ग मातेला गरोदरपणात झाला तर मूल मतिमंद होण्याची संभावना जास्त असते. उच्च रक्तदाब किंवा रक्तातील विषबाधा यामुळे मातेद्वारा अर्भकाला मिळणारा रक्तपुरवठा कमी होतो. त्यामुळे मतिमंदत्व येऊ शकते.

प्रसूतीदरम्यानच्या जटील समस्या : जसे की नाळ बाळाच्या गळ्याभोवती अडकणे. जर प्रसूती दिलेल्या तारखेपेक्षा उशिरा झाली तर, जर प्रसूतीच्या वेळी काही जटील समस्यांमुळे बाळ गुदमरले किंवा प्रसूतीमार्गातून बाहेर येताना बाळाच्या मेंदूला इजा होऊन मेंदूला प्राणवायू कमी पडला, बाळ जन्मल्या जन्मल्या रडले नाही तर मेंदूला इजा झाल्यामुळे मतिमंदत्व येते.

बाळ जन्मल्यानंतरचे आजार : काही आजार जसे के मेंदूज्वर, गोवर, डांग्या खोकला, ल्कु (Hemophilis Influenza ) जिवाणूंच्या संसर्गामुळे गंभीर स्वरूपात झाले तर मेंदूला इजा होऊन मतिमंदत्व येते. बाळाला दुखापतीमुळे मेंदूला इजा पोहोचल्यास मतिमंदत्व येऊ शकते.

आयोडिनची कमतरता हे टाळता येण्यासारखे कारण मतिमंदत्वासाठी कारणीभूत ठरू शकते. तीव्र प्रमाणात आयोडिनच्या कमतरतेमुळे Cretinis नावाचा आजार होतो. या आजारात शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटते.

**पर्यावरणातील घटक :** आईवडिलांमुळे जन्माला आल्यानंतर मुलांना सुरक्षित वाटत असते. जर पालकांचे मुलांकडे दुर्लक्ष झाले तर असुरक्षिततेची भावना निर्माण होते. मुलांना योग्य ते मानसिक व शारीरिक उत्तेजन न मिळाल्यामुळे मुले विकासाचे टप्पे गाठू शकत नाहीत. कुपोषित व दारिद्र्यरेषेखालील मुले सर्वसामान्यपणे चांगले आयुष्य जगण्यासाठी लागणाऱ्या सुविधा न मिळाल्यामुळे, योग्यवेळी औषधोपचार न मिळाल्यामुळे मतिमंदत्वाला बळी पडतात. नकळत पारा आणि शिसे खाण्यामुळे मतिमंदत्व येते. (Lead Poisoning)

मतिमंदत्वाचे निदान करण्यासाठी मुलांची संपूर्ण वैद्यकीय तपासणी, कौटुंबिक आजारांविषयीची माहिती, प्रसूतीविषयीची माहिती, जडणघडणीच्या विषयीची माहिती घेणे आवश्यक आहे. कारण जर मतिमंदत्वाचे कारण हे जनुकीय चयापचयातील बिघाडामुळे असेल तर अशा मुलांना जास्त देखरेखीची गरज असते. जर कुपोषण, आयोडिनची कमतरता हे कारण असेल तर योग्यवेळी उपचार करून मुलांचा विकास करता येऊ शकतो.

अशा मुलांना चांगल्या कौटुंबिक, सामाजिक वातावरणाची, भावनिक आधाराची, दैनंदिन कार्यात उत्तेजन देण्याची गरज असते.

होमिपॅथिक उपचार हे शरीर व मन या दोहोंचा एकत्रित विचार करून केले जातात. त्यामुळे होमिओपॅथिक उपचारांनी मतिमंद मुलांचा शारीरिक, भावनिक, बौद्धिक व सर्वांगीण विकास साधता येतो.

**: केस :**

ही एका ३ वर्षे वयाच्या मतिमंद मुलीची केस आहे. जिला फिट्सचा (आकडी) देखील त्रास आहे. खूप उपचार करून थकल्यानंतर मुलीच्या आजाराला कंटाळून तिच्या वडिलांनी आईला धमकी दिली की, तिला मारून टाकेन. ती छोटी मुलगी माझ्या तपासणी कक्षामध्ये आली तेव्हा तिच्या कपाळावरच्या डाव्या बाजूला लाल रंगाची खूण होती. मला ती थोडी विक्षिप्त आणि चंचल वाटली. जरी वर्णाने काळीसावळी असली तरी तिचे डोळे अतिशय तेजस्वी होते.

थोड्याच वेळात ती जोरात किंचाळायला लागली व जमिनीवर लोळू लागली. ती तिचा राग पाय आपटत व्यक्त करू लागली. माझ्या निदर्शनास आले की, तिच्या शरीराच्या डाव्या बाजूला जोरजोरात हिसके बसत होते व तिने तिचे डोके दोन्ही हातांनी झाकून घेतले.

तिचा डावा पाय व डावा हात आपोआप खेचला जात होता. साधारण १०-१५ मिनिटांनी ती पूर्ववत झाली. तिच्या आईने सांगितले की, तिला दोन वर्षांपासून अशा फिट्स अचानक कधीही येतात आणि नेहमी शरीराच्या डाव्या बाजूलाच हिसके बसतात व डाव्या डोळ्याचीच उघडझाप होते व डोळ्याच्या आतील बुबुळे वर होतात. तिच्या वयाला अनुसरून तिचा शारीरिक व मानसिक विकास होत नव्हता. तीन वर्षांची झालेली असूनसुद्धा ती बोलू शकत नव्हती किंवा बोलण्याला काहीच प्रतिसाद देत नव्हती.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व :**

१. तहान व भूक अतिशय कमी होती.

२. चॉकलेट व दुधाची आवड

३. भाताची नावड

४. चेहऱ्यावर व नाकाच्या शेंड्यावर घाम येणे.

५. सतत १० ते १५ मिनिटांनी लघवीला होणे. लघवीच्या ठिकाणी खाज येणे.

६. शरीराच्या डाव्या कुशीवर झोपते. झोपेत रात्रीच्या वेळेत डाव्या पायाची सतत हालचाल होते. झोपेत लाळ गळणे.

**स्वभाव :**

ती लहान असल्यामुळे तिची माहिती तिच्या आईने व काकीने दिली.

दोन-तीन महिन्यांची असल्यापासूनच तिच्यामध्ये काही प्रगती नाही. ती तीन वर्षांची झाली तरी तिला व्यवस्थित बोलता येत नाही, जेवता येत नाही. ती फक्त जमिनीवर पडलेली असते. तिचा डावा हात आणि पाय सतत हलत राहतो. डोळ्याची बुबुळे सारखीच वर जातात. तोंड वेडेवाकडे करीत राहते.

तिच्या वडिलांना असं वाटतं की, तिने पूर्ण बरे व्हावे किंवा तिला मरण यावे. तिला फिट्सचा त्रास कधीही सुरू होतो. जास्तकरून रात्रीचा होतो.

**1. फिट्सच्या वेळेस ती काय करते?**

- फिट्सच्या वेळेस ती हातपाय आखडून धरते - डोळे वरती फिरवते, तोंड वेडेवाकडे करते.

ताप आल्यावर तिला जास्त प्रमाणात फिट्स येतात आणि तोंडातून लाळ गळते. अशावेळेस तिला खाण्यापिण्याचे सुद्धा समजत नाही.

**2. तिचा स्वभाव कसा आहे?**

- तिला गाणी ऐकायला व डान्स करायला खूप आवडते, जर गाणी बंद केली तर ती जोरजोरात रडते. इतकी की शेजारी तिच्या आवाजाने त्रस्त होतात. ती जोपर्यंत दमत नाही तोपर्यंत रडतच राहते. ती एक हात जमिनीवर टेकून बाकीचे अंग हलवत नाचते. जर तिला थांबवायचा प्रयत्न केला तर ती जोरजोरात रडते. तिला प्रत्येक पदार्थांचा वास घेण्याची सवय आहे. जी लोक तिच्यावर माया करतात, त्यांच्याबरोबरच तिला राहायला आवडते. तिला बसने प्रवास करायला आवडतो.

**3. तिच्या वेळेस तुम्हाला गरोदरपणात काय त्रास होत होता?**

- माझे सतत पोट दुखत असायचे, माझ्या सासरकडच्या लोकांनी मला कायम दबावात ठेवले होते. मला काहीच बोलण्याची मुभा नव्हती. हिच्या जन्मानंतर घरात सतत भांडणे व्हायची. मालकांनी सांगितले होते की, ती बरी असेल तरच घरी ये, नाहीतर येऊ नकोस.

**विशेष माहिती :**

१. डोक्याला इजा होण्याची भीती

२. वडिलांचा राग व आईकडून दुर्लक्षपणामुळे तक्रारी वाढणे.

३. पायांचा अस्थिरपणा, जमिनीवर लोळण्याची सवय

४. प्रत्येक पदार्थांचा वास घेण्याची सवय

५. संगीताची आवड व त्यामुळे बरे वाटणे.

६. मानसिक व बौद्धिक वाढ खुंटलेली

७. थंड प्रकृती


८. खाण्यात दुधाची आवड

९. तोंडातून लाळ गळणे.

१०. शरीराच्या डाव्या बाजूच्या तक्रारी

या लक्षणांवरून मी तिला होमिओपॅथिक औषध सुरू केले. प्रथम तिच्या फिट्सची तीव्रता कमी झाली. जमिनीवर लोळणे बंद झाले. हळूहळू फिट्सची वारंवारता कमी होऊन संपूर्णपणे नाहीशी झाली.

जोरजोरात सतत रडणे थांबले, ती स्वभावाने शांत झाली. व्यवस्थित जेवण करू लागली. एका वर्षात तिची शारीरिक वाढ तर झालीच, पण ती बोलताना व्यवस्थित शब्द वापरून बोलू लागली. होमिओपॅथीने तिला फक्त बरेच नाही केले, तर सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तिचे प्राण तिच्या वडिलांपासून वाचवले. अशाप्रकारे होमिओपॅथिक औषधामुळे तिचे जीवन सार्थक झाले आणि तिच्या आईवडिलांची माया तिला पुन्हा मिळू लागली. बरोबरीच्या मुलींबरोबर ती पुन्हा खेळायला लागली.




**पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७.**
**संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**







# मेडिकल सीईटी परीक्षेतही चाटे शिक्षण समूहाची बाजी

**| पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनामार्फत घेण्यात आलेल्या एम.एच.सी.ई.टी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. या परीक्षेमध्ये चाटे ज्युनिअर कॉलेजच्या आदित्य पाटीलने १९० गुण मिळविलेले आहे. ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या करिअरची दिशा ठरविणारी असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या परीक्षेला अनन्य साधारण महत्त्व आहे. मेडिकल सीईटीचा निकाल लागल्यानंतर वेगवेगळ्या कोर्सेसना जाण्याचा विद्यार्थ्यांचा मार्ग या परीक्षेतील गुणांमुळे स्पष्ट झाला आहे.




चाटे शिक्षण समूहाच्या क्लासेसच्या विविध शाखा व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चाटे समूहाची यशाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे. या निकालावरून चाटे समूहाच्या कार्यपद्धतीचे यश अधोरेखीत झाले आहे. यशाचा हा वारसा यापुढील कालावधीतही असाच चढता राहील, असा विश्वास पुणे विभागाचे संचालक प्रा. फुलचंद चाटे यांनी व्यक्त करुन सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# लाचखोर समाजकल्याण निरीक्षकाला अटक

**| पुणे : प्रतिनिधी**

सर्वसामान्य लोकांची मोफत होणारी कामे करून घेण्यासाठी प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून पैसे उकळले जाण्याचा प्रकार काही नवीन नाही. पण एका अत्याचारित महिलेला समाजकल्याण विभागाकडून मंजूर झालेल्या रकमेचा चेक देण्यासाठी लाच मागितल्याचा घृणास्पद प्रकार उघडकीस आला आहे.

अत्याचारित महिलेला समाजकल्याण खात्याकडून एक लाख वीस हजाराची रक्कम मंजूर झाली होती. या रकमेचा चेक घेण्यासाठी तिचा भाऊ स्वारगेट येथील समाजकल्याण विभागाच्या कार्यालयात आला होता. मात्र त्या रकमेचा चेक देण्यासाठी भावाला स्वारगेट येथील समाजकल्याण निरीक्षक श्रीकांत अंकुश सावंत (वय ४२) याने पाच हजार रुपयांची लाच मागितली होती.

सावंतविरुद्धच्या तक्रारीला अनुसरून लाचलुचपत विभागाच्या पथकाने सापळा रचला असता पाच हजार रुपयांची मागणी करून तडजोडीअंती चार हजार रुपये मागितल्याचे सिद्ध झाले. खडक पोलीस ठाण्यात लाच मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला व त्याला अटक करण्यात आली. पुढील तपास सहायक पोलीस आयुक्त जे. डी. कळसकर करीत आहेत. शासकीय सेवकाने लाच मागितल्यास १०६४ या हेल्पलाइनवर संपर्क करण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी केले आहे.

## आपलं व्यासपीठ

### आवडीचे क्षेत्र निवडा

पुणे विभागासह राज्यात दहावीच्या निकालाची टक्केवारी वाढली असल्याने विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे नातेवाईक व पालकांनी विद्यार्थ्यास कोणत्या क्षेत्रात प्रवेश घ्यायचा याबाबत चाचपणी करण्यास सुरुवात केली आहे. बहुतांश पालक आपल्या पाल्यास चांगले गुण मिळाले म्हणून आपण सांगू त्याच क्षेत्रात मुलाने करिअर करावे अशी अपेक्षा बाळगून आहेत. मात्र ते संबंधित मुलाची आवड काय आहे हे जाणत नाहीत. त्यामुळे भविष्यात मुलांना अपयश येते.

**संजय सुरवसे, हडपसर,**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

**लायसन्स काढणाऱ्यांचे प्रमाण सध्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र त्या प्रमाणात लायसन्सचा कोटा अत्यल्प आहे. त्यातच यंत्रणा कायमच बंद पडत आहे. त्यामुळे लायसन्स काढण्यासाठी आरटीओत कायम गर्दी असते. त्यामुळे लायसन्स देण्याच्या कोट्यात वाढ करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत. एजंटांच्या माध्यमातून लायसन्सची प्रक्रिया पूर्ण केल्यास ती विनासायास होते, असा नागरिकांचा अनुभव आहे. त्यामुळेच एजंटमुक्त आरटीओ या उद्दिष्टाची पूर्तता होणार का, असा प्रश्न उपस्थित होतो. याबाबत तरुणांच्या या प्रतिक्रिया...**

यूथ Talkers

सनील गाडेकर

### झेरॉक्स ग्राह्य धरावे



लायसन्स काढण्यासाठी विविध कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे असते. मात्र सर्वच कागदपत्र एकाच वेळी उपलब्ध होतील असे नाही. त्यामुळे किमान लर्निंग लायसनसाठी मूळ कागदपत्रांचे झेरॉक्स ग्राह्य धरावे. त्यामुळे अनेकांची धावपळ थांबेल. पक्क्या लायसन्ससाठी मूळ कागदपत्र न दिल्यास त्याचा अर्ज बाद करावा. तसेच ही सर्व यंत्रणा ऑनलाइनच हवी.

**- दिपक गडगे**

### यंत्रणेत बदल आवश्यक



लायसन्सची प्रक्रिया जलद आणि सुखकर व्हावी यासाठी ऑनलाइन प्रणाली राबविण्यात येत आहे. मात्र त्यात अनेक दोष आहेत. फॉर्म भरताना अनेकदा एरर येतात. त्यामुळे फॉर्म भरण्यात खूप वेळ जातो आणि मानसिक त्रास होतो. या यंत्रणेमुळे पैशाची मात्र बचत होते. अत्यंत कमी किमतीत लायसन्स मिळते. तसेच एजंटगिरीलाही काहीसा लगाम लागला आहे. यंत्रणेत पुरेसा बदल केल्यास नागरिक नक्कीच त्याचा जास्त प्रमाणात वापर करतील.

**- अमोल उबाळे**

### सर्व ऑनलाइन हवे



लायसन्स काढण्याबाबत सरकारी नियमांचे पालन होणे गरजेचे आहे. आरटीओ कार्यालयात कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी रांगेत उभे राहावे लागते. त्या प्रत्येक ठिकाणी ३० ते ४० मिनिटे जातातच. तसेच विविध प्रकारे काउंटरही कमी आहेत. त्यामुळे मनुष्यबळ आणि काऊंटर वाढविल्यास लायसन्स काढणे अधिक सुखकर होईल. लायसन्सची सर्व यंत्रणा अगदी लर्निंगची टेस्टही ऑनलाइन करण्यात यावी, त्यामुळे आरटीओत येण्याची गरजच भासणार नाही.

**अमित जैन**